## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कृत हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना

**थेट मुलाखत** (WALK IN INTERVIEW)

कल्याण डोंबिवली महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभागाकडील १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत **हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करीता** खालील संवर्गातील रिक्त पदे **११ महिने २९ दिवस** कालावधीसाठी कंत्राटी स्वरूपात व करार पध्दतीने एकत्रित मानधनावर भरणेकामी अर्हताधारक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात येणार आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता थेट मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | पदनाम | एकुण रिक्त पदे | रिक्त पदांची प्रवर्गनिहाय संख्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | साशैमा प्र | आदुघ | खुला |
| १ | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) MBBS उमेदवार न मिळाल्यास B.A.M.S. | ५ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ |
| २ | स्टाफ नर्स (महिला) Staff Nurse (Female) | ५ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ |
| ३ | बहुउद्देशीय कर्मचारी (Male MPW) | ५ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | १ |

### १) वयोमर्यादा–

१. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दि. ३१.०६.२०२५ रोजी उमेदवाराचे वय जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

२. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई दि. २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार पदांसाठी पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी यांचे वयोमर्यादा ७० वर्ष व रुग्णसेवेशी संबंधित इतर पदांची उदा. औषध निर्माता, क्ष– किरण तंत्रज्ञ पदांची वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कडून प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक प्रमाणपत्र दृष्ट्या सक्षम असल्याचे अर्जासोबत जोडणे बंधन राहील.

### २) अर्ज भरण्या बाबतच्या सूचना–

१. उमेदवाराने स्वत: पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणेच अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी

२. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

३. जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष) अचूक नमुद करावे.

४. अर्जात उमेदवाराचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

५. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जा सोबत करणे आवश्यक आहे.

६. अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:च्या वैध ई–मेल आयडी/पर्याय ई–मेल आयडी, चालू भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. पात्र उमेदवारांची यादी उपरोक्त नमूद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.सदर ई–मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालू ई–मेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

७. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवास आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे. असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराने आपला जातीचा तपशील अचूकपणे नमूद करावा.

९. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायम स्वरूपी पत्ता अर्जामध्ये अचूक नमूद करावा.

१०. अर्जदाराविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा,याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.

११. अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत/स्वहस्ताक्षरात सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात

घेतले जाणार नाहीत.

३) शैक्षणिक अर्हता/पात्रता

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयमर्यादा | कामाचे ठिकाण व वेळ | प्रतिमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) HBT Apla Dawakhana | ५ | MBBS, Clinical experience in Govt. and/or private sector. And registrátion with MMC | १८ ते ७० वर्ष | HBT Apla Dawakhana वेळ दु. २.०० ते रात्री १०.०० | रू. ६०,०००/— |
| | | | MBBS उमेदवार न मिळाल्यास B.A.M.S. experience in Govt. and/or private sector. And registration with MCIM | १८ ते ७० वर्ष | HBT Apla Dawakhana वेळ दु. २.०० ते रात्री १०.०० | B.A.M.S. पदवीधारक वैद्यकिय अधिकारी पदाकरीता केंद्र शासनाच्या CPHC च्या मार्गदर्शक सुचनांनुसार रू. २५०००/- अधिक रू. १५०००/— (PBI) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रति महिना रू. ४००००/— मानधन |
| २ | स्टाफ नर्स (महिला) Staff Nurse (Female ) | ५ | 12 th Pass with BSc Nursing/GNM Course and Experience will be preferred registration with MNC | १८ ते ६५ वर्ष | HBT Apla Dawakhana वेळ दु. २.०० ते रात्री १०.०० | रू. २०,०००/— |
| 2 | बहुउददेशीय कर्मचारी (पुरुष) (MPW- Male) | ५ | 12 th Pass in Science + Paramedical Basic training course **OR** Sanitary Inspector Course | किमान १८ वर्ष ते (खुला ३८) /(राखीव ४३) | HBT Apla Dawakhana वेळ दु. २.०० ते रात्री १०.०० | रू. १८,०००/— |

सदर भरती प्रक्रियेमध्ये M.B.B.S. पदवीधारक उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल जर ते उमेदवार उपलब्ध न झाल्यास, १५ व्या वित्त आयोग अंतर्गत HBT आपला दवाखाना करीता वैद्यकीय अधिकारी M.B.B.S. म्हणुन पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यत अथवा ६ ते ११ महिन्यांकरीता B.A.M.S. पदवीधारक उमेदवारास वैद्यकीय अधिकारी म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात यावी.

१.शैक्षणिक अर्हतेबाबतच्या सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.
२. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिराती मध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
३. अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे.
४. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये संबधित संस्थेकडून प्रमाणित करून घ्यावे.
५. उमेदवारांनी फॉर्ममध्ये नमूद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल.
६. पात्र उमेदवारांनी नियुक्तीच्या दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मूळ गुणपत्रिका सादर न केल्यास सदरील उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल.
७. पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यता प्राप्त विद्यापीठातून प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे.

**४) अनुभव—**

१. शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचा फक्त शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये, त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.

२. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे. अशाच शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेचा तपशील फॉर्ममध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.केवळ शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. खाजगी, स्वयंसेवी संस्था, बाहय यंत्रणाव्दारे कार्यरत पदावर कामाचा अनुभवाचा विचार करणेत येणार नाही. समकक्ष कामाचा अनुभव ग्राहय धरणेत येईल. तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करताना संस्थेचे लेटर हेड, जावक क्रमांक व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

३. अनुभव प्रमाणपत्रामध्ये तपशील नमूद करताना दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.

४. ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**५) संगणक अर्हता—**

१. MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा.

**६) कुटुंबाचे प्रमाणपत्र—**

१. लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात आली असून दि. २३/०७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार पदभरतीसाठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत.

२. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रूजु होण्या अगोदर सादर करणे अनिवार्य आहे.

**७) उमेदवारांचा फोटो व स्वाक्षरी—**

१. उमेदवाराने फॉर्म वर फोटोकरीता राखीव जागेवर त्याचे अलीकडील काढलेला सुस्पष्ट फोटो चिकटवावा.फोटो स्टेपल करू नये.

२. राखीव जागेत स्वाक्षरी करावी

**८) निवड प्रक्रिया**

१. सदर पदभरतीच्या अनुषंगाने प्राप्त होणा—या उमेदवारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार/गुणांकन पध्दतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकारी मा. अध्यक्ष, निवड समिती यांच्याकडे राखून ठेवले आहेत.

२. उमेदवाराची निवड करावयाची असल्यास शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार गठित करण्यात आलेल्या समिती यांच्या मान्यतेने मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि. १७/०३/२०२२ रोजीच्या पत्रानुसार निकष लावून १:३ व १:५ उमेदवारांची निवड गुणांकन पध्दतीने करण्यात येईल.

उमेदवार निवडताना उमेदवाराचे गुणांकन पदवी/पदविका परोक्षतील अंतिम वर्षाचे गुण अतिरिक्त अर्हता विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार करण्यात येईल.

**९) थेट मुलाखती :—**

वैद्यकीय अधिकारी (MBBS/BAMS) हि पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

| अ.क्र. | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| 1 | Subject Knowledge | 10 |
| 2 | Research & Academic Knowledge | 10 |
| 3 | Leadership Quality | 10 |
| 4 | Administrative Abilities | 10 |
| 5 | Experience | 10 |
| | a)For Govt- Experience | 2 marks for one year |
| | b)For Private Experience | 1marks for one year |
| | Total Experience | 10 marks maximum |
| | एकूण गुण | 50 |

१०) गुणांकन पध्दती —

१. मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचे जा.क्र.राआसोमं/मनुष्यबळ पदभरती/१०६७०–११०१६/२०२३ दि.२७.०४.२०२३ रोजीचे पत्राव्दारे प्राप्त सुचनांनुसार गुणांकन पध्दतीने पात्र उमेदवारांची करण्यात येईल.

२. उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवाराचे ५० प्रमाणे Proportion काढावे.(उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion =60*50/100=30 ) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे.(उदा.१ Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त BSc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion =60*20/100=12 गुण ) | २० गुण |
| संबधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.(१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| एकूण | | १०० गुण |

२. गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांनी प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असून त्यानूसार उमेदवारांना नियुक्ती आदेश E-Mail व्दारे निर्गमित करण्यात येतील.

३. गुणांकन पध्दतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही.

**११) सर्वसाधारण सुचना**

१. सदर भरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती कल्याण डोंबिवली महानगरपालिकाच्या अधिकृत "संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.kdmc.gov.in या संकेस्थळास भेट देऊन माहिती प्राप्त करून घेणे अनिवार्य राहील. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

२. जाहीरातीत नमूद केलेले पद हे पूर्णत: कंत्राटी स्वरुपाचे असून ते राज्यशासनाचे नियमित पद नाही. या पदाचा राज्यशासनाच्या पदाशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्यशासनांच्या नियमित पदावर समायोजन करण्यांची मागणी करु शकणार नाही.

३. जाहीरातीत नमूद केलेले पदाचे वेतन हे एकत्रित ठोक मानधन आहे.

४. उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदांचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावा.जर मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज आरक्षणामधून सादर केलेला असेल, परंतु सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवारांचा अर्ज ग्रहय धरण्यात येणार नाही.

५. राखीव संवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या संवर्गाचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभही घेता येणार नाही.

६. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

७. थेट मुलाखतीकरिता इच्छूक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील कागदपत्रे १ ते १६ जोडण्यात यावीत.

८. गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन व वय देखील समान असले तर अशा वेळी उमेदवाराचा संबधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

९. सदरची भरती प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस गुणानुक्रमे पूर्ण यादीतील मेरीट मधील पुढील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियमानुसारी नियुक्ती आदेश दिले जातील. सदर निवड यादी ही तयार झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

१०.उमेदवारांकडून अर्धवट, अपुर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले गेला असल्याने, संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी व संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार स्विकारली जाणार नाही.

११.उमेदवारांनी वर नमुद केलेल्या कालावधीमध्ये, कार्यालयीन दिवशी, दिलेल्या वेळेत व्यक्तीश: उपस्थित राहुन अर्ज सादर करण्यात यावेत. नमुद मुदती अगोदर अथवा मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरूपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करू नये.

१२.अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१३. भरती प्रक्रिये दरम्यान ज्या ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल त्या त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१४. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतीही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१५.सदरहू भरती प्रक्रियेकरीता अर्ज दि. / /२०२५ अखेर राहणार असुन तदनंतर छाननी,लेखी परिक्षा/ मुलाखत प्रक्रिया, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती, आक्षेप प्राप्त करून घेणे व त्या निकाली काढणे आदी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरतीप्रक्रिया पार पाडून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी www.kdmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर विषयी कार्यालयात विचारणा करण्यात येऊ नये.

१६.निवड झालेल्या उमेदवारांना हिंदूहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याची वेळ **दुपारी २.०० ते रात्री १०.०० आहे.** तरी निवड झालेल्या उमेदवारांना करीता नियुक्ती आदेश देण्यात येतील. तसेच नियुक्ती आदेश दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत नियुक्तीचे ठिकाणी रूजू होणे बंधनकारक राहील.

१७.अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना रूग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार देण्यात येईल. याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद् करणेत येईल.

१८.अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढिल उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१९.मा.शासन मार्गदर्शक सुचनेनुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमानुसार अधिक तम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता २ दिवसांची मुदत देण्यात येईल व आक्षेपबाबत त्याच्या पुष्ठीर्थ योग्य पुरावे सादर करणेस सुचित करण्यात येईल.

**२०. हिंदूहदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करीता मंजुर पदांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानाशी संबंधीत नाहीत. त्यामुळे भविष्यात सदरील योजना बंद पडल्यास अथवा पदांना मंजुरी न मिळाल्यास निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियाना मध्ये/राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानामध्ये समावुन घेण्याचा दावा करता येणार नाही**

उमेदवाराने थेट मुलाखतीच्या वेळेस अर्जासोबत मुळ कागदपत्रे व त्याच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक आहे. संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे वरील अटी व शर्तीनुसार खालील दिलेल्या ठिकाण उपस्थित राहावयाचे आहे.

टिप :— ज्या दिवशी, ज्या पदासाठी थेट मुलाखत आयोजित करण्यात आली आहे, त्या पदासाठीचेच अर्ज सकाळी १०.०० ते ११.०० वाजेपर्यंत उपस्थित असणाऱ्या उमेदवारांकडून स्विकारण्यांत येतील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

मुलाखतीचे ठिकाण :— दुसरा मजला, आरोग्य मुख्यालय, फडके मैदानच्या बाजुला, आधारवाडी,
कल्याण (पश्चिम), ता.कल्याण, जि.ठाणे .

**सर्वसाधारण सूचना :—**

**(अ) अर्ज स्विकारण्याचा व थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ :—**

| थेट मुलाखतीचा दिनांक | तपशिल |
|---|---|
| दि. 09 /10/ २०२५<br>(— गुरुवार वार) | **वैद्यकीय अधिकारी पदांसाठी. —**<br>(१) अर्ज स्विकारण्याची वेळ :— सकाळी १०.०० ते ११.००<br>(२) अर्ज छाननीची वेळ : — सकाळी ११.०० ते दुपारी १.००<br>(३) थेट मुलाखतीची वेळ : — दुपारी ०२.०० पासून पुढे |

**(ब) अर्ज स्विकारण्याचा दिनांक व वेळ :—**

| अ.क्र. | पदनाम | दिनांक | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | स्टाफ नर्स (महिला)<br>Staff Nurse (Female) | अर्ज स्विकारणे व छाननी<br>दिनांक 08/ 10 /२०२५<br>(— बुधवार वार) | (१) अर्ज स्विकारण्याची वेळ :— सकाळी १०.०० ते ११.३०<br>(२) अर्ज छाननीची वेळ :— सकाळी ११.३० ते ०२.०० |
| २ | बहुउददेशीय कर्मचारी (पुरुष)<br>(Male MPW) | | |

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्मची प्रिंट
२) वयाचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला)
३) १० वी व १२ वी गुणपत्रक आणि सणद
४) पदवीचे गुणपत्रिक (१ ले वर्ष अंतिम वर्ष Attempt सह–जेणेकरून एकत्रित गुण काढणे शक्य होईल) व पदवी प्रमाणपत्र (Convocation Certificate)
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/Any other Medical Graduate with respective council registration (As Applicable)
६) ज्या–त्या शैक्षणिक अर्हतेस/ तांत्रिक पदांकरीता संबंधित परिषदेकडील नोंदणी लागू आहे त्या त्या शैक्षणिक अर्हतेची वैद्य असलेली परिषदेकडील तत्सम कौन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक राहील अन्यथा अपात्र ठरविण्यात येईल.
६) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
७) राखीव संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र
८) आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर
९) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१०) आधारकार्ड
११) पॅन कार्ड
१२) सध्याचा फोटो
१३) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१४) वाहन चालविण्याचा परवाना
१५) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१६) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

जाहिरातीमधील पदसंख्या, आरक्षण यामध्ये बदल होऊ शकतो आणि त्यानुसार यामध्ये वाढ/कमी करण्याचे अधिकार, तसेच विहित केलेला थेट मुलाखतीचा दिनांक व वेळ, ठिकाण इत्यादीमध्ये कोणत्याही टप्प्यावर, कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना राहतील. सदर जाहिरात कल्याण डोंबिवली महानगरपालिका नोटीस बोर्ड आणि www.kdmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, सदरहू भरती प्रक्रिये संदर्भात अधिक माहिती सदरहू संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

Signed by
Abhinav Goel
Date: 07-09-2025 16:15:39

(अभिनव गोयल) भाप्रसे
अध्यक्ष तथा आयुक्त,
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

| उमेदवाराचा फोटो<br><br>(येथे पासपोर्ट साइज फोटो चिकटवावा ) |
|---|

## अर्जाचा नमुना

| कार्यालयीन वापरासाठी | (१) अर्ज पात्र/अपात्र आहे :– | |
|---|---|---|
| | (२) अपात्र असल्यास कारण :– | |

( अर्ज छाननी करणाऱ्याची स्वाक्षरी व नांव )

प्रति,
मा.आयुक्त सो.,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण.

विषय :– ––––––––––––––––––––––––– या पदासाठी अर्ज

(१) **उमेदवाराचे संपुर्ण नाव** : श्री./श्रीम./कु.........................................................................................

(२) **पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :–** ..........................................................................................

..........................................................................................................................................

दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र. १................................................ २...........................................................

ई मेल आयडी ..........................................................................................................................

(३) **जन्मदिनांक :** (४) **मुलाखत दिवशीचे वय :**

| तारीख | महिना | वर्ष | | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**(लागू श्रेणी समोर / अशी खुण करा.)**

(५) लिंग :– पुरुष / स्त्री (६) विवाहीत / अविवाहीत. (७) किती अपत्ये आहेत / नाहीत :–

(८) आरक्षित वर्ग (लागू रकान्यात ✓ अशी खुण करा.)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व. | सा.शै.मा.प्र. | आ.दु.घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| जात | पोटजात | जात वैधता प्रमाणपत्र | |
|---|---|---|---|
| | | आहे | नाही |

| उमेदवाराकडे नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट | | एकूण वार्षिक उत्पन्न रुपये |
|---|---|---|
| आहे | नाही | |

(९) **शैक्षणिक अर्हता :–**

(टिप : ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाची किमान शैक्षणिक पात्रता नमुद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र | शिक्षण | शाळा/मंडळ/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण महिना व वर्ष | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | |
| २ | एच.एस.सी. | | | |
| ३ | पदवी | | | |
| ४ | पदविका | | | |
| ५ | पदव्युत्तर पदवी | | | |
| ६ | पदव्युत्तर पदविका | | | |
| ७ | इतर (MSCIT,Typing) | | | |

(१०) **कामाचा अनुभव :–** एकूण अनुभव : .......... वर्षे ........... महिने

| अ. क्र | कार्यालय/संस्थेचे नांव व पत्ता | Govt/ private | पदाचे नाव | कालावधी | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| १ | | | | | | ............वर्षे<br>........... महिने |
| २ | | | | | | ............वर्षे<br>........... महिने |
| ३ | | | | | | ............वर्षे<br>........... महिने |

(११) उमेदवारास पूर्वी फौजदारी अथवा दिवाणी प्रकरणात शिक्षा झाली होती का ? (होय / नाही)
– झाली असल्यास त्याचा तपशिल नमुद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

(१२) उमेदवारा विरुध्द पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित/प्रस्तावित आहे का ? (होय / नाही)
– असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल सोबत जोडावा.

(१३) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता :– ..........................................................................................

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र**

नमुना अ (नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कुमारी.................................................. श्री.............................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय.........वर्षे, राहणार......................................................................... .............. .........................................................................................याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१. मी "..............................................................." या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ....................... (संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च,२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या................. आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :– ( .............................. )
दिनांक :– / /२०२५. अर्जदाराची सही

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला/आपली विश्वासू

ठिकाण :–
दिनांक :– / /२०२५ अर्जदाराची सही : ..............................
अर्जदाराचे नांव : ( ..............................)

**सोबत ज्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडण्यात आल्या आहेत त्यासमोर ✓ अशी खुण करावी**

१) पुर्ण माहिती भरलेला फॉर्मची प्रिंट
२) वयाचा पुरावा
३) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षाचे प्रमाणपत्र)
४) गुणपत्रिका
५) महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (MBBS)/Any other Medical Graduate with respective council registration (As Applicable).
६) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे
७) जात वैधता प्रमाणपत्र
८) आवश्यकतेनुसार नॉन क्रिमीलेअर
९) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
१०) आधारकार्ड
११) पॅन कार्ड
१२) सध्याचा फोटो
१३) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
१४) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१५) फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र